# साम्राज्यवाद

## अ. भौगोलिक शोध व वसाहतवाद

**खलील प्रशनंची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा**

### पार्श्वभूमी

**१. आधुनिक जगाच्या इतिहासात कोणत्या क्रांतींनी महत्त्वाची भूमिका बजाविली?**

**उत्तर:** i. आधुनिक जगाच्या इतिहासात अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांती यांनी महत्त्वाची भूमिका बजाविली.

ii. औद्योगिक क्रांती ही अठराव्या शतकातील महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. आधुनिक काळातील साम्राज्यवाद हे औद्योगिक क्रांतीचेच फलित होते.

**२. पूर्वीच्या काळी राजे कोणती महत्त्वाकांक्षा बाळगत असत? त्याचा काय परिणाम झाला?**

**उत्तर:** i. पूर्वीच्या काळी, अनेक राजे शेजारच्या किंवा दूरवरच्या प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगत असत.

ii. या महत्त्वाकांक्षेतूनच जगात ग्रीक, रोमन, तुर्की साम्राज्ये निर्माण झाली.

३. **पारंपरिक साम्राज्यवादाचे स्वरूप स्पष्ट करा.**

[जुलै १६]

**उत्तर:** i. ‘आपल्या देशाबद्दल वाटणारी अभिमानाची गोष्ट आणि स्वत:च्या लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन करणे’ हे पारंपरिक साम्राज्यवादाचे मुख्य प्रेरणास्त्रोत होते.

ii. प्रारंभीच्या काळात राजे, महाराजे आपला साम्राज्यविस्तार करताना संपत्ती आणि इतर आर्थिक फायदे मिळविणे या गोष्टींना फारसे महत्त्व देत नव्हते.

iii. अनेक राजे शेजारच्या किंवा दूरवरच्या प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगत असत.

iv. या महत्त्वाकांक्षेतूनच जगात ग्रीक, रोमन, तुर्की साम्राज्ये निर्माण झाली. भारतात चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक, बादशाह अकबर यांनी बलाढ्य साम्राज्ये निर्माण केली.

**४. युरोपियन व्यापारात कॉन्स्टॅन्टिनोपलचे काय महत्त्व होते?**

**उत्तर:** i. कॉन्स्टॅन्टिनोपल (इस्तंबूल) हा आशियाकडे जाणारा सर्वांत कमी अंतराचा भूमार्ग होता.

ii. इ.स. १४५३ मध्ये ऑटोमन तुर्कांनी हे ठिकाण जिंकून घेतले.

iii. यामुळे, आशियाकडे जाणारा खुष्कीचा मार्ग युरोपीय व्यापाऱ्यांसाठी बंद झाला आणि युरोपीय व्यापार थांबला.

**५. युरोपियन खलाशांना नवे सागरी मार्ग शोधण्यास कशामुळे प्रोत्साहन मिळाले?**

**उत्तर:** i. युरोपातील व्यापारी पूर्वेकडील देशांबरोबर व्यापार करण्यास उत्सुक होते.

ii. पोर्तुगीज राजा हेन्री याने नौकानयनाला उत्तेजन दिले.

iii. युरोपातील अनेक राजे व व्यापारी यांनी नवे सागरी मार्ग शोधून काढणाऱ्या दर्यावर्दींना प्रोत्साहन दिले.

iv. होकायंत्र व ॲस्ट्रोलॅब (वेधयंत्र) यांसारख्या यंत्रांचा शोध, नव्याने तयार केलेले नकाशे आणि मार्गदर्शक पुस्तके सागरी प्रवासाला उपयुक्त ठरली.

## साम्राज्यवादाचा अर्थ व व्याख्या

***६. साम्राज्यवादाचा अर्थ सांगून साम्राज्यवादाची व्याख्या लिहा.** [मार्च १५]

**उत्तर:** i. साम्राज्यवाद हा शब्द 'इम्पिरिअम' या लॅटिन शब्दापासून निर्माण झाला आहे. याचा अर्थ अधिकार किंवा सत्ता होय.

ii. विकसित राष्ट्राने अविकसित राष्ट्रावर आपले सर्वांगीण वर्चस्व प्रस्थापित करणे व अनेक नव्या वसाहती स्थापन करणे याला साम्राज्यवाद असे म्हणतात.

iii. अन्य शब्दांत, एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर सर्वांगीण वर्चस्व प्रस्थापित करणे म्हणजे साम्राज्यवाद होय.

## आर्थिक साम्राज्यवाद

***७. आर्थिक साम्राज्यवाद म्हणजे काय?** [मार्च १६]

**उत्तर:** i. देशाला जास्तीत जास्त आर्थिक फायदे मिळवून देण्यासाठी अप्रगत राष्ट्रावर आर्थिक व राजकीय वर्चस्व मिळवून तेथील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग आपल्या देशासाठी करणे म्हणजेच आर्थिक साम्राज्यवाद होय.

ii. एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर आर्थिक वर्चस्व प्रस्थापित करणे यालाच आर्थिक साम्राज्यवाद म्हणतात.

## प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा.

### भौगोलिक शोध

***१. युरोपीय लोकांना जलमार्गाचा शोध घेण्याची आवश्यकता वाटू लागली.**

**उत्तर:** i. १४५३ मध्ये कॉन्स्टॅन्टिनोपल (इस्तंबूल) हे ठिकाण ऑटोमन तुर्कांनी जिंकून घेतले.

ii. आशियाकडे जाणारा खुष्कीचा मार्ग (भूमार्ग) युरोपियन व्यापाऱ्यांसाठी बंद झाला.

iii. या काळात युरोपातील व्यापार वाढला होता. हा खुष्कीचा मार्ग तुर्कांच्या ताब्यात गेल्यामुळे युरोपीय लोकांना नवीन जलमार्गाचा शोध घेण्याची आवश्यकता वाटू लागली.

### साम्राज्यवादाची कारणे

**२. वैज्ञानिक शोधांमुळे साम्राज्यवाद वाढीस लागला.**

**उत्तर:** i. जॉन के पासून राईट बंधूंपर्यंतच्या संशोधकांनी लावलेल्या अद्‌भुत शोधांमुळे मानवी जीवन गतिमान झाले.

ii. बाष्पशक्ती, विद्युतशक्ती, कोळसा, लोखंड या शोधांमुळे वाहतूक व दळणवळण क्षेत्रात प्रचंड गतिमानता आली.

iii. विज्ञानाने आधुनिक शस्त्रांचीही निर्मिती केली. त्यामुळे मानवातील अतिमहत्त्वाकांक्षा जागृत झाली.

अशा प्रकारे, अनेक राष्ट्रांमध्ये साम्राज्यवाद वाढीस लागला.

**३. *युरोपात नवीन बाजारपेठांचा शोध सुरू झाला.**

**किंवा**

**युरोपियनांना नवीन बाजारपेठांचा तातडीने शोध घेण्याची गरज भासली.**

**उत्तर:** i. औद्योगिक क्रांतीच्यावेळी यंत्रांमुळे मालाच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली.

ii. तसेच मालाच्या उत्पादनाच्या वेगातही वाढ झाली.

iii. त्यामुळे तयार झालेल्या मालाची देशांतर्गत विक्री करणे अशक्य झाले.

त्यातून युरोपात नवीन बाजारपेठांचा शोध सुरू झाला.

**४. युरोपियन राष्ट्रे साम्राज्यवाद विस्तारासाठी आशिया व आफ्रिका खंडांकडे वळली.**

**उत्तर:** i. औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादनात प्रचंड वाढ होऊन कच्च्या मालाची मागणी वाढू लागली.

ii. युरोपीय राष्ट्रांमध्ये बाजार स्पर्धात्मक झाला होता. त्यामुळे युरोपियनांना आपला माल स्वस्त किमतीत विकणे आवश्यक होते.

iii. त्याकरिता उत्पादनखर्च कमी करणे आणि कच्चा माल स्वस्त दरात मिळवणे या दोन गोष्टी महत्त्वाच्या होत्या.

iv. आशिया, आफ्रिका खंडांतील राष्ट्रे नैसर्गिक साधनसंपत्तीने संपन्न होती.

अशा प्रकारे, या नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर करून घेण्याच्या उद्देशाने साम्राज्यवादाच्या विस्तारासाठी युरोपियन राष्ट्रे आशिया व आफ्रिका खंडांकडे वळली.

***५. युरोपात भांडवलशाही अर्थव्यवस्थेची पायाभरणी झाली.**

**उत्तर:** i. अप्रगत राष्ट्रावर आर्थिक व राजकीय वर्चस्व मिळवून तेथील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करून आपल्या देशाला जास्तीत जास्त आर्थिक फायदे मिळवून देणे, हे नव्या साम्राज्यवादाचे प्रमुख उद्दिष्ट होते.

ii. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती प्रथम सुरू झाली जिचा नंतर युरोपीय राष्ट्रांमध्ये प्रसार झाला.

iii. औद्योगिक क्रांतीने भांडवलशाहीला जन्म दिला व त्यामुळे युरोपीय देशांची आर्थिक भरभराट झाली.

iv. भांडवलशाही ही मोठ्या प्रमाणावर उत्पादन व त्याच्या विनिमयावर आधारलेली अर्थव्यवस्था होती.

v. यामुळे, युरोपात नव्या प्रकारचा साम्राज्यवाद अस्तित्वात येऊन भांडवलशाही अर्थव्यवस्थेची पायाभरणी झाली.

**प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.**

## भौगोलिक शोध

**१. १५ ते १७ व्या शतकामधील भौगोलिक शोधांवरती टीप लिहा.**

**उत्तर:** i. ख्रिस्तोफर कोलंबस, जॉन कॅबट, अमेरिगो व्हेस्पुसी यांनी पंधराव्या शतकात अमेरिका खंडाचे उत्तर, पूर्व आणि मध्य भाग प्रथमत: प्रकाशात आणले.

ii. १६०६ ते १७३२ मध्ये इंग्लंडने उत्तर अमेरिका खंडाच्या पूर्व किनारपट्टीवर तेरा वसाहती स्थापन केल्या.

iii. वास्को-द-गामा यांनी भारताकडे जाणाऱ्या सागरी मार्गाचा शोध लावला.

iv. पहिला पोर्तुगीज खलाशी फर्डिनांड मॅगेलॉन हा सागरी मार्गाने पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण करण्याच्या ईर्ष्येने सागरी सफरीवर निघाला; परंतु सफरीवर असतानाच तो मारला गेला. नंतर त्याच्या सहकाऱ्यांनी ही प्रदक्षिणा पूर्ण केली.

v. स्पॅनिश, पोर्तुगीज, डच, इंग्रज व फ्रेंच यांनी नव्याने शोधलेल्या प्रदेशांमध्ये वसाहती स्थापन केल्या.

## वसाहतवाद

***२. वसाहतवाद म्हणजे काय?**

**उत्तर:** i. एका देशातील काही लोकांनी दुसऱ्या देशाच्या भूप्रदेशातील एका विशिष्ट भागात सामर्थ्याच्या बळावर वस्ती करणे म्हणजे 'वसाहतवाद' होय.

ii. वसाहती स्थापन केल्यावर प्रबळ देश तेथे आपले आर्थिक वर्चस्व व लष्करी सत्ता राजकीय सीमा विस्तृत करण्यास वापरत असत.

iii. वसाहतवादाद्वारे साम्राज्यवाद वाढत गेला ज्यामुळे बऱ्याच युरोपीय राष्ट्रांनी आशिया व आफ्रिका खंडांमधील राष्ट्रांवर आपला साम्राज्यवाद लादला.

**३. ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी युरोपीय राष्ट्रांनी कोणते मार्ग अवलंबिले?**

**उत्तर:** i. ख्रिस्ती धर्माचा प्रसार जगभर व्हावा अशी युरोपियनांची इच्छा होती.

ii. त्यांचा धर्म व संस्कृती जगात सर्वांत श्रेष्ठ आहे अशी त्यांची समजूत होती.

iii. इंग्रजांनी भारतात पाऊल ठेवले ते हाती 'तराजू व बायबल' घेऊनच, त्यातील बायबल हे धर्मप्रसाराचे प्रतीक होते.

iv. वसाहती स्थापन केल्यानंतर अनेक धर्मप्रसारक तेथे पोहचले.

v. ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठी अनेक मिशन युरोपियनांनी स्थापन केल्या.

***४. साम्राज्यवादी वर्चस्वाची कोणतीही चार रूपे सांगा.**

**उत्तर:** युरोपीय राष्ट्रांनी साम्राज्यवादी उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी आपल्या गरजेनुसार आशिया व आफ्रिका खंडांवर बऱ्याच मार्गांनी वर्चस्व प्रस्थापित केले. त्याची रूपे खालीलप्रमाणे:

i. **राजकीय वर्चस्व:**

युरोपियन राष्ट्रांनी या खंडांवर राजकीय गुलामगिरी लादली. तसेच एखाद्या देशाला संरक्षण देऊ करणे, जेथे शक्य असेल तेथे 'फोडा व राज्य करा' या नीतीचा अवलंब करणे या सगळ्या धोरणांचा अवलंब करून फायदा मिळविला.

ii. **व्यापारी मक्तेदारी:**

युरोपीय देशांनी व्यापारी करार या देशांवर जबरदस्तीने लादून स्वत:ची व्यापारी मक्तेदारी निर्माण केली.

iii. **धर्माचा प्रसार:**

ख्रिस्ती धर्माचा प्रसार करून साम्राज्यवादी राष्ट्रांनी आशिया आणि आफ्रिका खंडांवर आपली संस्कृती लादण्याचा प्रयत्न केला.

iv. **आर्थिक वर्चस्व:**

युरोपीय राष्ट्रांनी आर्थिक साम्राज्यवादाचा अवलंब करत वसाहतींवर खालीलप्रमाणे आर्थिक वर्चस्व प्रस्थापित केले:

अ. कच्च्या मालासाठी वसाहती काबीज करणे आणि त्याच प्रदेशात पक्क्या मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठा उपलब्ध करणे.

ब. लष्करीदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे आपल्या ताब्यात घेणे.

v. **आर्थिक धोरण:**

स्वत:च्या देशाची अर्थव्यवस्था संपन्न करण्यासाठी युरोपियन राष्ट्रांनी आपल्या ताब्यातील वसाहतींवर वेगवेगळे निर्बंध लादणे आणि स्वत:च्या देशासाठी अनेक व्यापारी सवलती मिळवणे असे आर्थिक धोरण अवलंबिले.

**प्र.५. खालील प्रश्नाचे उत्तर प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा.**

**साम्राज्यवादाची कारणे**

१. ***साम्राज्यवादाची कारणे लिहा.**

**किंवा**

**साम्राज्यवादाची कोणतीही तीन कारणे लिहा.**

**[ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** प्रबोधन चळवळीतून आकारास आलेल्या युरोपीय राष्ट्रांमध्ये साम्राज्यवादाची लालसा निर्माण झाली. युरोपीय राष्ट्रांनी १९१४ पर्यंत आशिया व आफ्रिका खंड आपल्या वर्चस्वाखाली आणला. साम्राज्यवादाची कारणे पुढीलप्रमाणे:

i. **वैज्ञानिक शोध:**

अ. संशोधकांनी लावलेल्या बाष्पशक्ती, विद्युतशक्ती, कोळसा, लोखंड या शोधांमुळे वाहतूक व दळणवळण क्षेत्रात क्रांती झाली.

ब. विज्ञानाने आधुनिक शस्त्रांचीही निर्मिती केली. विज्ञानामुळे मानवातील अतिमहत्त्वाकांक्षा जागी झाली.

ii. **औद्योगिक क्रांती:**

अ. औद्योगिक क्रांतीमुळे आधुनिक साम्राज्यवादाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली.

ब. औद्योगिक क्रांतीमध्ये यंत्रांमुळे उत्पादनाचा वेग वाढला.

क. त्यामुळे तयार झालेल्या मालाची देशांतर्गत विक्री होणे अशक्य झाले.

ड. त्यातून नवीन बाजारपेठांचा शोध सुरू झाला.

iii. **कच्च्या मालाची आवश्यकता:**

अ. उत्पादनात वाढ झाल्यामुळे कच्चा माल कमी पडू लागला.

ब. युरोपातील बाजार स्पर्धात्मक झाला होता. या स्पर्धेत टिकावयाचे असेल, तर आपला माल स्वस्त किमतीत विकणे आवश्यक होते.

क. त्याकरिता उत्पादनखर्च कमी करणे आणि कच्चा माल स्वस्तात मिळविणे आवश्यक होते.

ड. कच्चा माल मिळविण्यासाठी वसाहत हेच मुख्य साधन होते. यामुळे साम्राज्यवादी दृष्टिकोनातून युरोपीय राष्ट्रे आशिया व आफ्रिका खंडांकडे वळली.

iv. **आशिया आणि आफ्रिका खंडांची संपन्नता:**

अ. आशिया, आफ्रिका खंडांतील राष्ट्रे नैसर्गिक साधनसंपत्तीने संपन्न होती.

ब. आशिया खंडात मसाल्याच्या पदार्थांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होत होते. तसेच सोने-चांदी, हिरे, लोखंड आणि कोळसा या खनिज पदार्थांचे साठे आफ्रिका खंडात विपुल होते.

क. या नैसर्गिक साधनसंपत्तीचा फायदा घेण्यासाठी युरोपियन राष्ट्रांनी आशिया आणि आफ्रिका खंडांत साम्राज्यवादास सुरुवात केली.

**v. युरोपातील नवोदित राष्ट्रे:**

अ. जर्मनी व इटली ही नवी राष्ट्रे उदयास आली.

ब. इंग्लंडप्रमाणेच वसाहती मिळविण्याची प्रेरणा घेऊन नवोदित राष्ट्रांनी त्यांच्या गरजा भागविण्यासाठी आक्रमक साम्राज्यवादाचा पुरस्कार केला.

**vi. राजकीय वर्चस्वाची महत्त्वाकांक्षा:**

अ. सागरातील आणि जमिनीवरील लष्करी ठाणी जिंकून घेण्याची स्पर्धा युरोपीय राष्ट्रांमध्ये सुरू झाली.

ब. एखाद्या देशाचे मोठेपण त्याच्या ताब्यात असलेल्या वसाहतींवरून ठरू लागले.

क. या साम्राज्यवादाच्या विकासातून युरोपीय राष्ट्रांमध्ये परस्परांविषयी संशयाचे वातावरण निर्माण झाले.

ड. प्रत्येक राष्ट्र आपल्या रक्षणाची जय्यत तयारी करू लागले. त्यातून वसाहती मिळविण्याची स्पर्धा वाढतच गेली.

**vii. धर्मप्रसार:**

अ. ख्रिस्ती धर्माचा प्रसार जगभर व्हावा अशी युरोपियनांची इच्छा होती.

ब. त्यांचा धर्म व संस्कृती जगात सर्वांत श्रेष्ठ आहे अशी त्यांची समजूत होती.

क. वसाहती स्थापन केल्यावर अनेक ख्रिश्चन मिशन केवळ धर्मप्रसाराचे काम करण्यासाठी स्थापन झाल्या.

**viii. आशिया आणि आफ्रिका खंडांतील राष्ट्रांचा दुबळेपणा:**

अ. आशिया आणि आफ्रिका खंडांतील राष्ट्रे राजकीय व आर्थिकदृष्ट्या दुबळी होती.

ब. अनेक आक्रमणे व सरंजामशाही यांमुळे या राष्ट्रांचा ऱ्हास झाला होता.

क. या परिस्थितीचा फायदा घेऊन प्रबळ युरोपीय राष्ट्रांनी त्यांना आपल्या वर्चस्वाखाली आणले.

## लक्षात ठेवण्यासारख्या महत्त्वाच्या घटना

| वर्ष | घटना | महत्त्व/परिणाम/ कारणे |
|---|---|---|
| १४५३ | कॉन्स्टॅन्टिनोपल (इस्तंबूल) ऑटोमन तुर्कांनी जिंकून घेतले. | आशियाकडे जाण्याचा खुष्कीचा मार्ग (भूमार्ग) युरोपीय व्यापाऱ्यांसाठी बंद झाला. त्यामुळे युरोपीय लोकांना नवीन जलमार्गाचा शोध घेण्याची आवश्यकता वाटू लागली. |
| १६०६ ते १७३२ | इंग्लंडने उत्तर अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर तेरा वसाहती स्थापन केल्या. | – |
| १९१४ | आशिया आणि आफ्रिका साम्राज्यवादी सत्तेखाली आले. | प्रबोधन चळवळीतून आकारास आलेल्या युरोपीय राष्ट्रांमध्ये आधुनिक साम्राज्यवादाची लालसा निर्माण झाली. या लालसेतून आशिया व आफ्रिका खंड आपल्या वर्चस्वाखाली आणला. |


## महत्त्वाच्या संज्ञा


| | |
|---|---|
| **फोडा आणि राज्य करा नीती** | फोडा आणि राज्य करा ही नीती म्हणजे अस्तित्वात असलेल्या शक्तिशाली रचनेला भेदणे आणि छोट्या छोट्या शक्तिशाली समूहांना एकत्र येऊ न देणे. या नीतीचा मुख्य उद्देश नफा कमविणे हे असते. उदा. ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' ही नीती भारतातील लोकांत धर्माच्या आधारावर फूट पाडण्यासाठी तसेच छोट्या छोट्या प्रांतावर वर्चस्व मिळविण्यासाठी वापरली. |
| **साम्राज्यवाद** | "विकसित राष्ट्राने अविकसित राष्ट्रावर वर्चस्व प्रस्थापित करणे". |
| **गळे-कापू स्पर्धा** | प्रचंड स्पर्धा किंवा भयंकर परिस्थिती. |

## महत्त्वाची नावे

| | |
|---|---|
| **ख्रिस्तोफर कोलंबस, जॉन कॅबट, अमेरिगो व्हेस्पुसी** | या खलाशांनी पंधराव्या शतकात अमेरिका खंडाचे अनुक्रमे उत्तर, पूर्व व मध्य हे भाग सर्वप्रथम शोधले. |
| **वास्को-द-गामा** | भारताकडे जाणाऱ्या सागरी मार्गाचा शोध लावला. |
| **फर्डिनांड मॅगेलॉन** | पोर्तुगीज खलाशी जो सागरी मार्गाने पृथ्वी प्रदक्षिणा करण्याच्या ईर्ष्येने सागरी सफरीवर निघालेला; परंतु सागरी सफरीवर असतानाच मारला गेला. |

**उजळणी तक्ता**




## ब. आशियातील साम्राज्यवाद

### खलील प्रशनंची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा

**भारतामधील साम्राज्यवाद**

***१. युरोपियन राष्ट्रांनी आशिया खंडातील कोणकोणत्या प्रदेशांवर साम्राज्यवाद लादला?**

**उत्तर:** युरोपियन राष्ट्रांनी आशिया खंडातील भारत, चीन, जपान, म्यानमार (ब्रह्मदेश), इंडोनेशिया, मलाया, फिलिपाईन्स, थायलंड (सयाम) या देशांवर विविध प्रकारे आपला साम्राज्यवाद लादला.

**२. वास्को-द-गामा याने भारतात येण्यासाठी कोणता मार्ग निवडला?**

**उत्तर:** इ. स. १४९८ मध्ये वास्को-द-गामा याने आफ्रिका खंडाच्या दक्षिण टोकाला वळसा घातला व तो भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत (कोझीकोड) बंदरात पोहोचला.

**३. आपल्या भारतातील वास्तव्यात पोर्तुगीज व फ्रेंचांनी वर्चस्व प्रस्थापित केलेल्या प्रदेशांची नावे सांगा.**

**उत्तर:** i. पोर्तुगिजांनी भारतातील गोवा, दीव-दमण या प्रदेशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

ii. फ्रेंचांनी भारतातील वास्तव्यात चंद्रनगर, पाँडेचरी (पुदुच्चेरी), कारिकल, येनम व माहे या प्रदेशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

***४. इंग्रजांनी भारताच्या राजकारणात लक्ष द्यायला का सुरुवात केली?**

**उत्तर:** i. इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीने सुरुवातीस भारतात फक्त व्यापार करण्याचे धोरण अवलंबिले होते.

ii. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर सरदारांच्या आपापसातील मतभेदांमुळे मुघल सत्तेचा ऱ्हास होऊ लागला. या काळात भारतात राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यामुळे इंग्रजांनी भारताच्या राजकारणात लक्ष द्यायला सुरुवात केली.

## चीनमधील साम्राज्यवाद

**५. चीनमधील पहिल्या युरोपीय व्यापाऱ्यांविषयी लिहा.**

**उत्तर:** i. पोर्तुगीज हे चीनमध्ये येणारे पहिले युरोपीय व्यापारी होत.

ii. समुद्रमार्गे चीनमध्ये येऊन हे व्यापारी कॅन्टन बंदरात उतरले व त्या बंदरापुरत्या व्यापारी सवलती त्यांनी मिळवल्या.

iii. त्यानंतर पोर्तुगिजांनी मकाव बेट ताब्यात घेतले.

**६. औद्योगिक क्रांतीनंतर चीनमध्ये काय बदल झाले?**

**उत्तर:** i. सुरुवातीला चहा, रेशीम, चिनी मातीची भांडी अशा व्यापारातून चीनला भरपूर फायदा होऊ लागला.

ii. औद्योगिक क्रांतीच्या प्रसाराबरोबर पाश्चिमात्य देशातील वस्तू चीनमध्ये विकल्या जाऊ लागल्या.

iii. व्यापारवाढीसाठी चीनमधील युरोपीय व्यापाऱ्यांनी 'को–हाँग' नावाची संघटना स्थापन केली.

**७. साम्राज्यवादी राष्ट्रांनी चीनवर कशा प्रकारे आर्थिक वर्चस्व निर्माण केले? [ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** i. साम्राज्यवादी युरोपीय राष्ट्रांनी चीनकडून अनेक व्यापारी सवलती मिळवून चीनवर आर्थिक वर्चस्व प्रस्थापित केले.

ii. इंग्लंडने चीनच्या व्यापार व जकातीवर तसेच फ्रान्सने टपाल व्यवस्थेवर नियंत्रण ठेवले. चीनचे लोहमार्ग युरोपियन राष्ट्रांच्या नियंत्रणाखाली गेले.

## जपानमधील साम्राज्यवाद

***८ जपानला संन्यासी राष्ट्र का म्हणत असत? [मार्च १६]**

**उत्तर:** i. सोळाव्या शतकापासून पोर्तुगीज, स्पॅनिश, डच हे युरोपियन लोक जपानशी कमी अधिक प्रमाणात व्यापार करत होते.

ii. व्यापाराबरोबर ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्याचा प्रयत्न युरोपियनांनी केल्यामुळे जपानी लोकांनी त्यांना हाकलवून लावले.

iii. जपान एक आत्मकेंद्रित देश बनला. युरोपियन राष्ट्रांना जपानची सर्व दारे सुमारे दीडशे वर्षे बंद होती.

या वृत्तीमुळे जपानला संन्यासी राष्ट्र म्हणत असत.

**९. कमोडोर मॅथ्यू पेरी याने जपानी सरकारला कुठली विनंती केली?**

**उत्तर:** i. इ.स. १८५३ मध्ये अमेरिकन नाविक मोहिमेचा प्रमुख म्हणून कमोडोर मॅथ्यू पेरी याने प्रथम जपानमधील येडो आखातात प्रवेश केला.

ii. त्याने अमेरिकन जहाजांना जपानी समुद्रात संरक्षण व व्यापारी सवलती मिळाव्यात म्हणून जपानी सरकारला विनंती केली.

## प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा.

### भारतामधील साम्राज्यवाद

***१. पोर्तुगिजांना भारतात साम्राज्य निर्माण करता आले नाही. [ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** i. इ.स.१४९८ मध्ये वास्को-द-गामा हा पोर्तुगीज खलाशी भारताच्या कालिकत बंदरात पोहोचला.

ii. तेथील झामोरिन राजाकडून त्याने व्यापारी सवलती मिळवल्या.

iii. प्रारंभीच्या काळात भारताच्या राजकारणात पोर्तुगिजांना विशेष महत्त्व होते.

iv. परंतु, एकाच वेळेस धर्मप्रसार, सत्ताविस्तार आणि व्यापार या गोष्टी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

त्यामुळे, पोर्तुगिजांना भारतात साम्राज्य निर्माण करता आले नाही. पोर्तुगिजांना केवळ गोवा, दीव-दमण या प्रदेशावर समाधान मानावे लागले.

**२. फ्रेंचांच्या पराभवाने भारतात इंग्रजांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले.**

**उत्तर:** i. कर्नाटकातील तीनही युद्धे इंग्रज-फ्रेंच संघर्षातूनच निर्माण झाली.

ii. पहिल्या कर्नाटक युद्धामध्ये फ्रेंच सेनापती डुप्ले यांच्या कर्तृत्वामुळे फ्रेंचांना विजय मिळाला.

iii. दुसऱ्या कर्नाटक युद्धात इंग्रज सेनापती रॉबर्ट क्लाईव्ह यांच्या मुत्सद्देगिरीमुळे फ्रेंचांचा पराभव झाला आणि फ्रेंचांनी इंग्रजांशी पाँडेचेरीचा तह केला.

iv. कर्नाटक राज्यातील वांदिवाश येथे झालेल्या कर्नाटकच्या तिसऱ्या युद्धात इंग्रजांनी फ्रेंचांचा पराभव करून व्यापारी वर्चस्व प्रस्थापित झाले. फ्रेंचांचा पराभव झाला.

या पराभवाने इंग्रजांनी भारतात आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

***३. चीनचे विभाजन झाले नाही.**

**उत्तर:** i. साम्राज्यवादी राष्ट्रांच्या वर्चस्वाच्या प्रभाव क्षेत्रामध्ये चीनची विभागणी केली. या प्रक्रियेला 'चिनी टरबुजाचे वाटे' असे म्हणतात.

ii. चीनचे प्रत्यक्ष राजकीय विभाजन टाळण्यासाठी आणि आर्थिक लाभ उठविण्यासाठी १८९९ साली अमेरिकेने मुक्त व्यापारविषयक धोरणाची घोषणा केली.

iii. चीनच्या कोणत्याही भागात व्यापार करण्यासाठी सर्व देशांना समान हक्क असावेत असे ते धोरण होते.

सर्व साम्राज्यवादी राष्ट्रांनी अमेरिकेच्या या धोरणाला मान्यता दिली; परंतु रशियाने मान्यता न दिल्याने चीनचे विभाजन झाले नाही.

## जपानमधील साम्राज्यवाद

**४. *तोकुगावा शोगुनशाहीच्या ऱ्हासास सुरुवात झाली.** [मार्च १४]

**किंवा**

**जपानचे अलिप्ततेचे धोरण संपुष्टात आले.**

**उत्तर:** i. अमेरिकन नाविक मोहिमेचा प्रमुख कमोडोर मॅथ्यू पेरी याने अमेरिकन जहाजांना जपानी समुद्रात संरक्षण व सवलती मिळाव्यात म्हणून जपानी सरकारला विनंती केली.

ii. पेरीच्या नौदलाचा आकार व सामर्थ्य लक्षात घेऊन जपानी सम्राटाचा पंतप्रधान तोकुगावा शोगुन याने अमेरिकेशी ३१ मार्च १८५४ रोजी कानागावा येथे व्यापारी करार केला.

iii. या करारानुसार जपानने अमेरिकेस अनेक सवलती मंजूर केल्या. तसेच जपानच्या नियमाप्रमाणे जपानमध्ये व्यापार करण्याची अमेरिकेस परवानगी देण्यात आली.

यामुळे, जपानचे अलिप्ततेचे धोरण संपुष्टात येऊन तोकुगावा शोगुनशाहीच्या ऱ्हासास सुरुवात झाली.

## प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.

### भारतामधील साम्राज्यवाद

**१. इंग्रजांनी भारतात सत्ताप्रसार कसा सुरू केला?**

उत्तर: i. इंग्रजांनी इ.स. १६०० मध्ये भारताबरोबर व्यापार करण्याकरिता ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली.

ii. इंग्रज भारतात आले तेव्हा उत्तर भारतात मुघलांची सत्ता होती.

iii. इ.स. १६१५ मध्ये मुघल बादशहा जहांगीरकडून ईस्ट इंडिया कंपनीने सुरत येथे वखार स्थापन करण्याची परवानगी मिळवली.

iv. सुरुवातीस कंपनीने भारतात फक्त व्यापार करण्याचे धोरण अवलंबिले होते.

v. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर सरदारांच्या आपापसातील मतभेदांमुळे मुघल सत्ता कमकुवत झाली. या काळात भारतात राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यामुळे इंग्रजांनी भारताच्या राजकारणात लक्ष द्यायला सुरुवात केली.

**२. इंग्रजांनी दक्षिण भारतात सत्ताप्रसार कसा केला?**

उत्तर: i. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात दक्षिण भारतात निजाम, हैदरअली व मराठे या तीन सत्तांचे वर्चस्व होते.

ii. इंग्रजांनी निजाम व मराठे यांची मदत घेऊन हैदर अली व त्याचा मुलगा टिपू सुलतान यांचा पराभव केला.

iii. इ.स. १७७५ पासून १८१८ पर्यंत इंग्रज व मराठे यांच्यात झालेल्या युद्धांत पहिले युद्ध मराठे जिंकले व दुसऱ्या दोन युद्धांत मराठ्यांचा पराभव झाला. अशा प्रकारे, इंग्रजांनी मराठी सत्तेवर विजय मिळवला.

iv. निजामाच्या साहाय्याने तैनाती फौजेच्या माध्यमातून इंग्रजांनी भारतात अनेक ठिकाणी साम्राज्य विस्ताराचा प्रयत्न केला.

**३. इंग्रजांनी मराठा सत्तेवर कसा विजय मिळविला?**

**उत्तर:** i. १७७५ पासून १८१८ पर्यंत इंग्रज व मराठे यांच्यात तीन युद्धे झाली.

ii. पहिल्या युद्धात महादजी शिंदे यांनी इंग्रजांचा पराभव केला, तर दुसऱ्या युद्धात इंग्रजांनी मराठ्यांचा पराभव केला.

iii. आष्टी येथे झालेल्या तिसऱ्या युद्धात इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावाचा पराभव करून मराठा सत्तेवर विजय मिळविला.

**४. ब्रिटिशांनी पंजाबमध्ये आपल्या राज्याचा विस्तार कसा केला?**

**उत्तर:** i. मराठ्यांच्या पराभवानंतर संपूर्ण भारतात शिखांची सत्ता सोडल्यास कोणतीही स्थानिक सत्ता उरली नव्हती.

ii. महाराजा रणजितसिंहांच्या प्रयत्नातून शिखांचे संघटन झाले.

iii. त्यांचा धोका ईस्ट इंडिया कंपनीला वाटत होता.

iv. महाराजा रणजितसिंह सत्तेवर असेपर्यंत इंग्रजांना शिखांवर वर्चस्व निर्माण करता आले नाही.

v. पंजाब, सिंध, काश्मीर व पाकिस्तानच्या परिसरात शिखांचे बलाढ्य राज्य होते.

vi. १८३९ मध्ये महाराजा रणजितसिंहांच्या मृत्यूनंतर शीख सत्ताधारी आणि सरदारांतील तंटे व दुही इंग्रजांच्या पथ्यावर पडले. १८४५ ते १८४९ या काळात शीख सत्ता नेस्तनाबूत करून शिखांच्या ताब्यातील विशाल प्रदेश इंग्रजांनी आपल्या ताब्यात मिळविला.

**५. ब्रिटिशांनी भारतात एकछत्री अंमल प्रस्थापित करण्यासाठी कोणत्या योजना अंमलात आणल्या?**

**उत्तर:** i. लॉर्ड डलहौसीने संस्थाने विलीनीकरणाची मोहीम हाती घेऊन दत्तक वारस नामंजूर केले.

ii. झांशी, नागपूर, सातारा, संबळपूर, उदयपूर इ. संस्थाने खालसा करून ब्रिटिश साम्राज्यास जोडली.

iii. अयोद्धेचे संस्थान अनागोंदी राज्यकारभार या नावाखाली खालसा केले.

iv. काही संस्थानिकांचे तनखे देणे बंद करून तेथे आपली सत्ता स्थापन केली.

v. अशा प्रकारे, १७५७ ते १८५७ या शंभर वर्षांच्या कालखंडात बहुतांश भारत आपल्या वर्चस्वाखाली आणून इंग्रजांनी एकछत्री अंमल प्रस्थापित केला.

**६. चीनने विदेशी व्यापाऱ्यांबरोबर कसे धोरण स्वीकारले होते?**

**उत्तर:** i. पोर्तुगिजांनंतर फ्रान्स, इंग्लंड, हॉलंड (नेदरलँड), बेल्जियम, रशिया यांनी व्यापारी सवलती मिळवून चीनच्या किनाऱ्यावर वखारी स्थापन करण्यास सुरुवात केली.

ii. परंतु, दोनशे वर्षे चीनने युरोपियनांना आपल्या अंतर्गत प्रदेशात ढवळाढवळ करू दिली नाही.

iii. चिनी समाजावर जुन्या कन्फ्युशियसवादी तत्वज्ञानाचा प्रभाव होता.

iv. चीनने जाहीर केलेल्या आठ कलमी नियमावलीनुसार युरोपियनांवर अनेक बंधने घालण्यात आली होती.

v. चीनमध्ये प्रवेश करणाऱ्या युरोपियनांना चिनी सम्राटाला कुर्निसात (नमस्कार) करावा लागत असे.

**७. *पेकिंगच्या तहानुसार चीनवर इंग्रजांनी कोणती बंधने लादली? किंवा पेकिंग तहाबद्दल सविस्तर माहिती द्या.**

**उत्तर:** i. इ.स. १८५६ मध्ये इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांनी चीनबरोबर युद्ध केले. त्याला अफूचे दुसरे युद्ध म्हणतात.

ii. चीनच्या मांचू सम्राटाचा पराभव होऊन अफूचे दुसरे युद्ध 'पेकिंगच्या तहाने' समाप्त झाले.

iii. पेकिंगच्या तहानुसार परकीय व्यापाऱ्यांना आणखी सहा बंदरे चीनने खुली केली.

iv. अफूच्या व्यापाराला परवानगी दिली.

v. परकीय वकिलांना पेकिंगमध्ये राहण्यास मान्यता दिली.

vi. चीनमध्ये ख्रिस्ती धर्मप्रसारकांना धर्मप्रसार करण्याची परवानगी देऊन त्यांच्या संरक्षणाचे आश्वासन दिले.

***८. इंग्रज व चीन यांच्यात झालेल्या अफू युद्धासंबंधी माहिती लिहा.**

**उत्तर: अफूचे पहिले युद्धः**

i. ब्रिटिश व्यापारी भारतातून अफू आणून चीनमधील बाजारात विकत होते.

ii. चिनी लोक चांदीच्या मोबदल्यात अफू विकत घेऊ लागले. त्यामुळे चांदीचा ओघ इंग्लंडकडे जाऊ लागला.

iii. चिनी सरकारचा अफूच्या व्यापारास विरोध होता; परंतु युरोपीय व्यापारी अफूचा चोरटा व्यापार करतच राहिले.

iv. अफूच्या व्यापारातून इ.स. १८३९ मध्ये इंग्रज व चीन यांच्यात अफूचे पहिले युद्ध सुरू झाले.

v. या युद्धात चीनचा पराभव होऊन मांचू राज्यसत्तेला इ.स. १८४२ मध्ये इंग्रजांशी तह करावा लागला. याला 'नानकिंगचा तह' म्हणतात.

vi. या तहानुसार इंग्लंडला कॅन्टन बंदराशिवाय इतर चार बंदरे व्यापारासाठी खुली करण्यात आली. हाँगकाँग बेटही इंग्रजांना मिळाले.

vii. त्याचाच फायदा घेऊन पुढील दहा वर्षांत अमेरिका, फ्रान्स, बेल्जियम, हॉलंड, पोर्तुगाल, रशिया या राष्ट्रांनी चीनकडून व्यापारासाठी सवलती मिळवल्या.

**अफूचे दुसरे युद्ध:**

i. इ.स. १८५६ मध्ये इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांनी चीन बरोबर युद्ध केले, त्याला अफूचे दुसरे युद्ध म्हणतात.

ii. चीनच्या मांचू सम्राटाचा पराभव होऊन अफूचे दुसरे युद्ध पेकिंगच्या तहाने संपले.

iii. या तहानुसार परकीय व्यापाऱ्यांना आणखी सहा बंदरे चीनने खुली केली.

iv. अफूच्या व्यापाराला परवानगी दिली. परकीय वकिलांना पेकिंगमध्ये राहण्यास मान्यता दिली.

v. चीनमध्ये ख्रिस्ती धर्मप्रसारकांना धर्मप्रसार करण्याची परवानगी देऊन त्यांच्या संरक्षणाचे आश्वासन दिले.

**९. 'चिनी टरबुजांचे' वाटे म्हणजे काय?**

**उत्तर:** i. अनेक साम्राज्यवादी राष्ट्रांनी चीनवर आर्थिक वर्चस्व निर्माण केले व चीनची आर्थिक लूट केली.

ii. इंग्लंडने चीनच्या व्यापार व जकातीवर नियंत्रण ठेवले.

iii. फ्रान्सने चीनच्या टपाल व्यवस्थेवर नियंत्रण ठेवले.

iv. चीनचे लोहमार्ग युरोपियन राष्ट्रांच्या नियंत्रणाखाली गेले.

अशा प्रकारे, साम्राज्यवादी राष्ट्रांच्या वर्चस्वाच्या प्रभाव क्षेत्रामध्ये चीनची विभागणी झाली. या प्रक्रियेला 'चिनी टरबुजाचे वाटे' असे म्हणतात.

**१०. अमेरिकेच्या मुक्त व्यापारविषयक धोरणाबद्दल लिहा.**

**उत्तर:** i. चीनचे प्रत्यक्ष राजकीय विभाजन टाळण्यासाठी आणि आर्थिक लाभ उठविण्यासाठी इ.स. १८९९ मध्ये अमेरिकेने मुक्त व्यापारविषयक धोरणांची घोषणा केली.

ii. चीनच्या कोणत्याही भागात व्यापार करण्यासाठी सर्व देशांना समान हक्क असावेत, असे ते धोरण होते.

iii. सर्व साम्राज्यवादी राष्ट्रांनी अमेरिकेच्या या धोरणाला मान्यता दिली; परंतु रशियाने मान्यता न दिल्याने चीनचे विभाजन झाले नाही.

iv. पुढील काळात साम्राज्यवादी राष्ट्रांनी चीनचे मोठ्या प्रमाणात शोषण केले.

## जपानमधील साम्राज्यवाद

---

***११. कानागावा करार संबंधी माहिती लिहा.**

**उत्तर:** i. अमेरिकन नाविक मोहिमेचा प्रमुख म्हणून कमोडोर मॅथ्यू पेरी याची नेमणूक करण्यात आली.

ii. १८५३ मध्ये कमोडोर मॅथ्यू पेरी याने प्रथम जपानमधील येडो आखातात प्रवेश केला.

iii. त्याने अमेरिकन जहाजांना जपानी समुद्रात संरक्षण व सवलती मिळाव्यात म्हणून जपानी सरकारला विनंती केली.

iv. पेरीच्या नौदलाचा आकार व सामर्थ्य लक्षात घेऊन जपानी सम्राट तोकुगावा शोगुन याने अमेरिकेशी ३१ मार्च १८५४ रोजी कानागावा येथे व्यापारी करार केला.

v. या करारानुसार:

   अ. लाकूड, कोळसा व पाणी घेण्यासाठी शिमोदा व हाकोदेत ही दोन बंदरे अमेरिकेला खुली करण्यात आली.

   ब. अमेरिकेच्या दूतास जपानमध्ये राहण्याची परवानगी मिळाली.

   क. अपघातात सापडलेल्या अमेरिकन खलाशांना जपानकडून मदत देण्यात आली.

   ड. जपानच्या नियमाप्रमाणे जपानमध्ये व्यापार करण्याची अमेरिकेला परवानगी देण्यात आली.

vi. या करारामुळे जपानचे अलिप्ततेचे धोरण संपुष्टात आले.

## प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा.

**भारतामधील साम्राज्यवाद**

***१. इंग्रजांनी भारतात आपला एकछत्री अंमल कसा सुरू केला?** **[मार्च १५; जुलै १६]**

**उत्तर: i. ईस्ट इंडिया कंपनीचे धोरण:**

भारताबरोबर व्यापार करण्याकरिता ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना इंग्रजांनी केली. सुरुवातीस कंपनीने भारतात फक्त व्यापार करण्याचे धोरण अवलंबिले होते; परंतु औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर मुघल सत्ता कमकुवत होऊन राजकीय अस्थिरता निर्माण झाली. त्यामुळे इंग्रजांनी भारताच्या राजकारणात लक्ष घालण्यास सुरुवात केली.

**ii. कर्नाटक युद्धे:**

कर्नाटकातील तीनही युद्धे इंग्रज-फ्रेंच संघर्षातूनच निर्माण झाली. पहिले युद्ध फ्रेंचांनी जिंकले; तर बाकीची दोन युद्धे इंग्रजांनी जिंकली. फ्रेंचांच्या पराभवाने भारतात इंग्रजांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

iii. **बंगालमध्ये इंग्रजी सत्तेचा पाया:**

इ.स. १७५७ मधील प्लासीची लढाई व १७६४ मधील बक्सारच्या युद्धातील इंग्रजांच्या विजयामुळे बंगालमध्ये इंग्रजी सत्तेचा पाया घातला गेला.

iv. **दक्षिण भारतात सत्ताविस्तार:**

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात दक्षिण भारतात निजाम, हैदरअली व मराठे या तीन सत्ता होत्या. इंग्रजांनी निजाम आणि मराठ्यांच्या मदतीने हैदरअली आणि त्याचा मुलगा टिपू सुलतान यांचा पराभव केला. १७७५ ते १८१८ पर्यंत इंग्रज व मराठे यांच्यात तीन युद्धे झाली. पहिल्या युद्धात महादजी शिंदे यांनी इंग्रजांचा पराभव केला, तर इतर दोन युद्धांत इंग्रजांनी मराठ्यांचा पराभव केला.

v. **तैनाती फौज:**

निजामाने आपल्या पदरी इंग्रजांची तैनाती फौज ठेवली. तैनाती फौजेच्या माध्यमातून इंग्रजांनी भारतात अनेक ठिकाणी साम्राज्यविस्तार केला.

vi. **पंजाबमधील सत्ताविस्तार:**

महाराजा रणजितसिंह सत्तेवर असेपर्यंत इंग्रजांना शिखांवर वर्चस्व निर्माण करता आले नाही. महाराजा रणजितसिंहांच्या मृत्यूनंतर शीख सत्ताधारी आणि सरदारांतील तंटे व दुही इंग्रजांच्या पथ्यावर पडले. इ.स. १८४५ ते १८४९ या कालखंडात शीखसत्ता नेस्तनाबूत करून ब्रिटिशांनी शिखांच्या ताब्यातील विशाल प्रदेश आपल्या ताब्यात मिळविला.

vii. **इंग्रजांचा एकछत्री अंमल:**

लॉर्ड डलहौसीने संस्थाने विलीनीकरणाची मोहीम हाती घेऊन दत्तक वारस नामंजूर केले. झांशी, नागपूर, सातारा, संबळपूर, उदयपूर इ. संस्थाने खालसा करून ब्रिटिश साम्राज्यास जोडली. तसेच अयोद्धेचें संस्थान अनागोंदी राज्यकारभार या नावाखाली खालसा केले.

अशा प्रकारे, इ.स. १७५७ ते १८५७ या शंभर वर्षांच्या कालखंडात बहुतांश भारत आपल्या वर्चस्वाखाली आणून इंग्रजांनी एकछत्री अंमल प्रस्थापित केला.

## चीनमधील साम्राज्यवाद

*२. **नानकिंग तहाविषयी सविस्तर माहिती द्या.**

**[मार्च १४]**

**उत्तर:** i. ब्रिटिश व्यापारी भारतातून अफू आणून चीनमध्ये विकत होते.

ii. चिनी सरकारचा या व्यापारास विरोध होता.

iii. परंतु युरोपीय व्यापारी अफूचा हा चोरटा व्यापार करतच राहिले.

iv. चिनी लोक चांदीच्या मोबदल्यात अफू विकत घेऊ लागले. त्यामुळे चांदीचा ओघ इंग्लंडकडे जाऊ लागला.

v. यामुळे अफूच्या व्यापारातून इंग्लंड व चीनमध्ये १८३९ मध्ये पहिले अफूचे युद्ध झाले.

vi. या युद्धात चीनचा पराभव होऊन मांचू राज्यसत्तेला इंग्रजांशी इ.स. १८४२ मध्ये नानकिंगचा तह करावा लागला.

vii. या तहानुसार इंग्लंडला कॅन्टन बंदराशिवाय इतर चार बंदरे व्यापारासाठी खुली करण्यात आली. हाँगकाँग बेटही इंग्रजांना मिळाले.

viii. त्याचाच फायदा घेऊन पुढील दहा वर्षांत अमेरिका, फ्रान्स, बेल्जियम, हॉलंड (नेदरलँड), पोर्तुगाल आणि रशिया या राष्ट्रांनी चीनकडून व्यापारासाठी सवलती मिळवल्या.

**३. जपान आशिया खंडातील एक बलशाली राष्ट्र कसे बनले?**

**किंवा**

**साम्राज्यवादाचा बळी ठरलेले जपान आशिया खंडातील एक बलशाली साम्राज्यवादी राष्ट्र म्हणून उदयास आले. स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. आधुनिक सामर्थ्याच्या बळावर या राष्ट्रांनी जपानकडून व्यापारी सवलती मिळवल्या.

ii. जपानला आपला लष्करी दुबळेपणा समजून आला व त्यांनी या साम्राज्यवादी सत्तांबरोबर टिकण्यासाठी आपल्या धोरणांत बदल केला.

iii. जपानने आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रांत अनेक क्रांतिकारक बदल केले.

iv. ज्या विज्ञान कलांच्या साहाय्याने साम्राज्यवादी राष्ट्रांनी त्यांना नमविले होते त्यापासूनच त्यांनी प्रेरणा घेतली.